# कार्यालय नगर परिषद पैठण जि. औरंगाबाद

Email:- munptn@gmail.com

जा.क्र. नपपै/प्रआयो/CLTC/2126/ २०२२ दिनांक:- १०/११/२०२२

## जाहिरात

## WALK IN INTERVIEW

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत (PMAY) पैठण नगर परिषद, पैठण साठी "शहरस्तरीय तंत्रिक कक्षातील (CLTC)" तज्ञांच्या एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ ११ महिन्यासाठी खालील नमूद केलेल्या कंत्राटी पदे भरण्यासाठी दिनांक १८../११../ २०२२ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून नगर परिषद पैठण सभागृह, पैठण येथे उमेदवारांच्या थेट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले असून, सर्व ईच्छुक / पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व शैक्षणिक अर्हतेच्या मुळ कागदपत्रासह अनुभव प्रमाणपत्रे व ईतर आवश्यक कागदपत्रासह थेट मुलाखतीस उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव कंत्राटी पद्धतीने | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक आर्हता | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | स्थापत्य अभियंता | ०१ | १. पदवी / पदवीत्तर पदवी (स्थापत्य अभियांत्रीकी)<br>२. बांधकाम Design आणि पर्यवेक्षण (Supervision) क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा On-Site अनुभव असल्यास प्राधान्य.<br>३. नगर परिषद अथवा महानगरपालिका मध्ये बांधकाम अभियंता म्हणून कार्य केले असल्यास प्राधान्य.<br>४. MSCIT (MS-Word, MS-EXCEL, MS-Powerpoint ज्ञान अत्यावश्यक), Auto-Cad व इतर स्थापत्य अभियांत्रीकी संबंधित तांत्रिक प्रमाणपत्र/अभ्यासक्रम प्राप्त केले असल्यास प्राधान्य.<br>५. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | ३५०००/- (अक्षरी पस्तीस हजार रुपये मात्र) |

सविस्तर जाहिरात (कर्तव्ये व जबाबदारी, अटी व शर्ती) खालील संकेस्थळावर उपलब्ध आहेत

https://aurangabad.gov.in

http://paithanmahaulb.maharashtra.gov.in/

(संतोष आगळे)
मुख्याधिकारी
नगर परिषद पैठण

# कार्यालय नगर परिषद पैठण जि. औरंगाबाद

Email:- munptn@gmail.com

जा.क्र. नपपै/प्रआयो/CLTC/2126/ २०२२ दिनांक:- १० /११/२०२२

## जाहिरात

**WALK IN INTERVIEW**

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत (PMAY) पैठण नगर परिषद, पैठण साठी "शहरस्तरीय तंत्रिक कक्षातील (CLTC)" तज्ञांच्या एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ ११ महिन्यासाठी खालील नमूद केलेल्या कंत्राटी पदे भरण्यासाठी दिनांक .१८/.११/ २०२२ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून नगर परिषद पैठण सभागृह, पैठण येथे उमेदवारांच्या थेट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले असून, सर्व ईच्छुक / पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व शैक्षणिक अर्हतेच्या मुळ कागदपत्रासह अनुभव प्रमाणपत्रे व ईतर आवश्यक कागदपत्रासह थेट मुलाखतीस उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव कंत्राटी पद्धतीने | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक आर्हता | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | स्थापत्य अभियंता | ०१ | १. पदवी / पदवीत्तर पदवी (स्थापत्य अभियांत्रीकी)<br>२. बांधकाम Design आणि पर्यवेक्षण (Supervision) क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा On-Site अनुभव असल्यास प्राधान्य.<br>३. नगर परिषद अथवा महानगरपालिका मध्ये बांधकाम अभियंता म्हणून कार्य केले असल्यास प्राधान्य.<br>४. MSCIT (MS-Word, MS-EXCEL, MS-Powerpoint ज्ञान अत्यावश्यक), Auto-Cad व इतर स्थापत्य अभियांत्रीकी संबंधित तांत्रिक प्रमाणपत्र/अभ्यासक्रम प्राप्त केले असल्यास प्राधान्य.<br>५. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | ३५०००/- (अक्षरी पस्तीस हजार रुपये मात्र) |

**पदाचे कर्तव्ये व जबाबदारी (Roles and Responsibilities):-**

१. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व मंजुरीस्तव वरिष्ठ कार्यालयास पाठविणे.

२. केंद्र शासनाच्या PMAY-MIS या संकेतस्थळावर लाभार्थ्यांना MIS आणि MPR रिपोर्ट भरणे.

२. मंजूर लाभार्थी यांची बांधकाम परवानगी संचिका छाननी करून मुख्याधिकारी यांच्या मंजुरीस्तव सादर करणे.

३. लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करून बांधकाम स्थिती अहवाल तयार करणे. लाभार्थ्यांच्या बांधकामाचे Geo-tagging करणे व Geotag रिपोर्ट तयार करणे.

४. PMAY संदर्भातील सर्व संचिका, बांधकाम परवानगी नोंदवही, Reports व पत्रव्यवहार जतन करणे व Update करणे.

५. लाभार्थ्यांना त्यांच्या बांधकाम स्थिती नुसार Fund Transfer करणे व त्याची माहिती Online Portal वर नियमित भरणे.

६. Action Plan Report तयार करणे व वरिष्ठ कार्यालयास पाठविणे.

७. Fund Utilisation Certificate तयार करणे व Fund Demand करणेसाठी पत्रव्यवहार करणे.

८. PMAY अंतर्गत बांधकामांवर पर्यवेक्षण करणे व बांधकाम पूर्ण करून घेणे.

९. PMAY अंतर्गत वरिष्ठ कार्यालय, म्हाडा कार्यालय तसेच लाभार्थी यांचेशी पत्रव्यवहार करणे.

१०. मुख्याधिकारी व विभाग प्रमुख यांनी वेळोवेळी सोपवलेली अनुषंगिक कामे पार पाडणे.

११. वेळोवेळी आयोजित करण्यात येणारी VC Join करणे व वरीष्ठ कार्यालयाने विचारलेली माहिती update करणे.

**टीप:- जाहिरातीत नमूद केल्यानुसार सदर पदांच्या अटी / शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

०१) उमेदवाराने A-4 साईजच्या पांढऱ्या कागदावर स्वतःच्या हस्ताक्षरात अर्ज सादर करावा. अर्ज सुवाच्य व वाचनीय असावा.

०२) उमेदवाराने अर्जावर अलीकडच्या काळातील एक पासपोर्ट साईज फोटो चिटकावून फोटोवर स्वतःची स्वाक्षरी करावी.

०३) उमेदवारास मुलाखती करिता स्वखर्चाने यावे लागेल व त्याबाबतीत कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात येणार नाही.

०४) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्र / कागदपत्र सादर केल्याचे / दिशाभूल केल्याचे अथवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

०५) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र / अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

०६) निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न दर्शविता स्थगित/रद्द अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद पैठण यांनी राखून ठेवले आहेत.

०७) उमेदवारांनी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवडी संबंधित कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

०८) उमेदवाराने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास सदर नोंदणी कार्डची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

०९) वयोमर्यादा: उक्त कंत्राटी पदासाठी खुल्या प्रवर्गासाठी किमान १८ वर्ष, कमाल ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवाराकरिता उच्च वयोमर्यादा ०५ वर्ष शिथीलक्षम राहील.

१०) उमेदवाराने अर्जासोबत आधार कार्ड, वयाचा दाखला म्हणून शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक शालांत (SSC) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.तसेच शैक्षणिक अर्हतांचे मूळ कागदपत्रे (सर्व वर्षांच्या/सत्राच्या गुणपत्रिका), अनुभव प्रमाणपत्र व मुलाखतींच्या अनुषंगाने ईतर आवश्यक कागदपत्रे स्वसाक्षांकित प्रतिचे 2 संच व सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीस उपस्थित राहावे.

११) शैक्षणिक अर्हतेसोबत इतर प्रमाणपत्र (Auto Cad, MSCIT, इतर तांत्रिक प्रमाणपत्र) असल्यास मुलाखती वेळेस सादर करावे.

१२) महाराष्ट्र शासन नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये विवाहित उमेदवाराने त्याचे दिनांक २८/०३/२००५ अन्वये हयात असलेली वा त्यानंतर जन्माला आलेली अपत्याची संख्या याबाबत विहित नमुना "अ" अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१३) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे रहिवाशी प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१४) सदरची पदे तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे त्यांना नियमित आस्थापणेवरील पदाप्रमाणे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच ११ महिन्याचा करार समाप्त झाल्यानंतर पदावर कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

१५) शासकीय / निमशासकीय सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयाच्या परवानगीने अर्ज सादर करणे आवश्यक राहील तसेच अर्जासमवेत सदर परवानगीची प्रत जोडणे आवश्यक राहील.

१६) निवड झालेल्या उमेदवाराने रुजू होताना अर्जासोबत रू.१०० च्या शपथ पत्रावर विहित नमुन्यातील करारनामा देणे बंधनकारक राहील.

१७) निवड झालेल्या उमेदवाराची यादी त्याच दिवशी दि.   /   / २०२२ नोटीस फलकावर प्रसिद्ध केली जाईल.

१८) कंत्राटी पदावर निवड झालेल्या उमेदवाराने ०३ दिवसांच्या आत नियुक्त केलेल्या ठिकाणी रुजु व्हावे लागेल. विहीत मुदतीत रुजू न झालेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येऊन करार रद्द समजण्यात येईल.

१९) कंत्राटी पदावर निवड झालेल्या उमेदवाराने नियमित हजरी रजिस्टर वर उपस्थिती नोंदविणे आवश्यक आहे. विनापरवानगी गैरहजर राहिल्यास वेतन कपात करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(संतोष आगळे)
मुख्याधिकारी
नगर परिषद पैठण